# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## सोमवार, दिनांक १६ जुलै, २०१२
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : (अ) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - असल्यास.**

**(ब) म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - असल्यास.**

**तीन : लक्षवेधी सूचना- (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

(१) **श्रीमती अलका देसाई वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मुंबई शहरात ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढिग साचल्यामुळे प्रत्येक पावसाळ्यात सर्वत्र रोगराई पसरत असल्याचे प्रकार घडत असूनही त्याकडे महापालिकेचे होत असलेले दुर्लक्ष, पावसाळयापूर्वी नाले सफाई करण्यात येवून नाल्यातील कचऱ्याचे ढीग मात्र नाल्याच्या काठावरच टाकले जाणे, त्यात शहरातील कचऱ्याचा अधिक भार पडत असणे, यामुळे शहरात सर्वत्र दुर्गंधी पसरुन नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे, याबाबत संबंधितांकडे वारंवार तक्रार करण्यात येऊनही पालिका मात्र कचऱ्याचे ढीग उचलण्यास टाळाटाळ व दुर्लक्ष करीत असणे, यामुळे शहरातील नागरिकांमध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. विनोद तावडे,** चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्य शासनाच्या येणाऱ्या महाराष्ट्र लक्ष्मी, सागर लक्ष्मी, पद्मिनी, अक्षय, पुष्कराज, वैभवलक्ष्मी या लॉटरीच्या २००५ ते २००७ या कालावधीत त्यांची छपाई, विक्री व सोडत यात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार व गैरव्यवहार झाल्याचे माहितीच्या अधिकारान्वये नुकतेच उघडकीस येणे, योजनेप्रमाणे तिकीट न छापणे, छापलेल्या तिकीटातून विजेत्यांचे नंबर काढणे, राज्य शासनाचे मुद्रणालय तिकीट छापण्यास सक्षम असताना कर्नाटक राज्यातील बंगळूरु येथे तिकिट छपाईस देणे, लॉटरी योजनेबाबत ग्राहक आणि विक्रेत्यांना विश्वासात न घेता योजनेत बदल करणे, तिकिट विक्री न करता बेकायदेशीररित्या सोडतीचा ड्रॉ

काढणे, अशा प्रकारे लॉटरी खेळणाऱ्या लोकांची फसवणूक करण्यात येणे, याकडे शासनाने केलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, या संपूर्ण प्रकरणाची आर्थिक गुन्हे अन्वेशन विभागामार्फत चौकशी करुन संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच ग्राहकांचा गमावलेला विश्वास पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी लॉटरी प्रक्रियेत पारदर्शकता व सुरक्षितता आणण्याची आवश्यकता, लॉटरी विक्रेत्यांना सवलती देण्याचे तसेच ग्राहकासाठी नवनवीन योजना आणण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. निरंजन डावखरे,** रमेश शेंडगे, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.विक्रम काळे **वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"कोकण विभागातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड व ठाणे जिल्ह्यातील शिक्षकांच्या मोठ्या प्रमाणावर बदल्या होणे, प्रामुख्याने ठाणे जिल्हा परिषदेंतर्गत एकूण १३ तालुक्यातील सुमारे ४६२ शिक्षक कर्मचाऱ्यांच्या तालुक्याबाहेर बदल्या करण्यात येणे, माहे जून महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात शाळा सुरू होऊन जुलैच्या पहिल्या सप्ताहामध्ये बदलीचे आदेश निर्गमित होणे, बदली झालेल्या शिक्षकांमध्ये महिला शिक्षक कर्मचारी बहुसंख्येने असणे तसेच सर्वाधित शिक्षकांची वयाची पन्नाशी उलटल्यामुळे प्रापंचिक व शारीरिक अडचणींमुळे त्यांना बदलीच्या ठिकाणी नोकरीत रुजू होणे अत्यंत गैरसोयीचे ठरणे, अशा अनेकविविध समस्यांमुळे शिक्षक कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

(४) **श्री. परशुराम उपरकर वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग - सावंतवाडी तालुक्यातील परप्रांतीय केरळीयन लोकांकडून मोठ्या प्रमाणात झालेली जमिन खरेदी, जमिन खरेदी करतेवेळी केरळीयन भाषेतले शेतकरी असल्याच्या दाखल्यांचे भाषांतर करुन खोटे दाखले सादर करणे, या केरळीयन लोकांकडून गुन्हेगारी प्रवृत्तीने लगतच्या शेतकऱ्यांच्या जमिनी हडप करुन कब्जा करणे, अशा तक्रारींकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होणे, सबरजिस्ट्रार कार्यालयाकडून या केरळीयन लोकांकडून वारेमाप पैसे घेऊन जमिनीचे खरेदी व्यवहार करण्यास मदत करणे, अशा प्रकारे सावंतवाडी तालुक्यातील केसरी सर्व्हे नं.८८ हिस्सा नं.० प्रद्युम्न वासुदेव दाभोळकर यांच्या

मालकीची जमिन कुळकायद्याची असतांना ४३- ग ची परवानगी न घेता परस्पर खरेदी करण्याचा प्रकार उघड होणे, या गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(५) **डॉ. सुधीर तांबे,** श्रीमती अलका देसाई **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **आदिवासी विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"आदिवासी विकास विभागाअंतर्गत असणाऱ्या आश्रमशाळांतील शिक्षण सेवकांस वाढीव मानधन न मिळणे, शालेय शिक्षण विभागातील शिक्षण सेवकांस दिनांक १ जानेवारी, २०१२ पासून वाढीव मानधन मिळण्याचा निणर्य शासनाने घेतला होता व त्याची अंमलबजावणी झालेली असणे, तथापि आश्रमशाळेतील शिक्षण सेवकांस मात्र त्याचा लाभ मिळत नसणे, त्यांच्यावर हा अन्याय होत असून त्यांच्यामध्ये असंतोषाची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**चार : विशेष उल्लेख सूचना - असल्यास -**

**<u>दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर</u>**

## (दुपारी २.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत)

**पाच : सन २०१२-२०१३ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (पहिला दिवस)**

खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल :-

१. उप मुख्यमंत्री
२. उद्योग, बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार मंत्री
३. सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) आणि पर्यटन मंत्री
४. गृहमंत्री
५. वने, पुनर्वसन व मदत कार्य आणि भूकंप पुनर्वसन मंत्री
६. सामाजिक न्याय, विमुक्त / भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय कल्याण आणि व्यसनमुक्ती कार्य मंत्री
७. कृषी व पणन मंत्री
८. ग्रामविकास मंत्री
९. सहकार आणि संसदीय कार्य मंत्री
१०. महसूल व खारजमिन मंत्री

**११.** पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री

**१२.** सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण आणि राजशिष्टाचार मंत्री

**१३.** कामगार व विशेष सहाय्य मंत्री

**सहा : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये- (बैठकीच्या शेवटी)**

**(१) श्री. जयंत पाटील, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"केंद्र शासनाच्या अनुदानावर राज्यामध्ये शालेय पोषण आहार योजना राबविण्यात येणे, चालू शैक्षणिक वर्षात शालेय पोषण आहार योजने अंतर्गत राज्यातील ३५ जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या सुमारे २५ हजार प्राथमिक शाळांना साहीत्याचे वाटप करण्याचे कंत्राट राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने औरंगाबाद येथील मे.गिरीजामाता जनहित सेवाभावी संस्था, नागपूर येथील इंटमेट प्रेस मेटल प्रायव्हेट लिमिटेड, वैद्य इंडस्ट्रीज व संकेत स्टील इंडस्ट्रीज यांना माहे फेब्रुवारी, २०१० व मार्च, २०१० या सुमारास साहित्य पुरवठा करण्याचे आदेश देऊन त्यांचे समवेत दर करार करुन सुमारे २० कोटी रुपयांची साहित्य खरेदी करणे, यामध्ये खुल्या बाजारात १८/- रुपयाला मिळणारा ग्लास २७/- रुपयाला, ४९ रुपयाला मिळणारे ताट ९५/- रुपयाला, ४८१ रुपयाला मिळणारी स्टील कोठी १,००८/- रुपयांना व २२४/- रुपयांना मिळणारी स्टील बादली ४८६/- रुपयांना याप्रमाणे खरेदी करुन शाळांना पुरवठा करणे व प्राथमिक शाळांच्या शिक्षकांना साहित्य न पहाताच वाटप करण्याचे आदेश देणे, या सर्व प्रकरणामध्ये झालेला भ्रष्टाचार कोटी रुपयांच्या वर असणे, सबब या गंभीर प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्रीमती शोभाताई फडणवीस वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात विशेषतः गडचिरोली जिल्ह्यातील ४६ हजार ८९३ हेक्टर जमीन सिंचनाचे प्रकल्प हे वन कायद्याच्या धोरणामुळे वंचित असणे, जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात नद्या असूनही जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सिंचनापासून प्रलंबित रहावे लागणे, मात्र १९८० च्या वन कायद्यामुळे गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी, ता.तुलतुली, धानोरा, ता.कारवाफा, मुलचेरा, ता.चेन्ना, गडचिरोली, ता.पोहार व कोरची ता.खोब्रागडी ह्या प्रकल्पाची कामे १९८३ पासून सुरु होवूनही अद्यापही कामे रखडली जाणे, त्यामुळे जिल्ह्यात सिंचनाची सोय असूनही अद्याप वनकायद्यामुळे सदर प्रकल्पाची कामे न होणे,

परिणामी जिल्ह्यातील शेतकरी सिंचनापासून वंचित राहून पिक न घेवू शकणे, त्यामुळे सदर प्रकल्पाना वन कायद्यापासून मुक्त करण्याची आवश्यकता, या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १३ जुलै, २०१२.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.